# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/ 95 /2020-21 दि. 30/04 /2020

**आदेश**

विषय :- उपायुक्त पदाचा पदभाराबाबत.

संदर्भ :- 1. शासन आदेश क्रमांक:- एमसीओ-2020/प्र.क्र.80/नवि-14, दि.13/04/2020.
2. शासन आदेश क्रमांक:- एमसीओ-2020/प्र.क्र.80/नवि-14, दि.15/04/2020.

ज्याअर्थी, श्री. अजित मुठे, विशेष लेखापरीक्षक, वर्ग-1, (सहकार विभाग) (सध्या कार्यरत उपायुक्त, जळगाव महानगरपालिका) व श्री. स.पा.वाघमारे, उपायुक्त, लातुर महानगरपालिका यांची संदर्भिय आदेशान्वये प्रशासकीय कारणास्तव उपायुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका या रिक्त पदावर प्रतिनियुक्ती नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, श्री. अजित मुठे व श्री. स.पा.वाघमारे यांना खात्यांचा पदभार सोपविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 49 अन्वये खालील दर्शविलेल्या खात्यांची व विभागांची प्रशासन आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळया प्रकरणात असलेल्या विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्य, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणासापेक्ष खालील नमुद उपायुक्त यांच्या नावाखाली दर्शविल्याप्रमाणे या आदेशान्वये सोपविण्यात येत आहे.

**(अ) श्री. संभाजी पानपट्टे, उपायुक्त,**

1. सार्वजनिक आरोग्य विभाग (साफ सफाई)
2. अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विभाग
3. उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग
4. वाहन विभाग

**(ब) श्री. अजित मुठे, उपायुक्त**

1. सामान्य प्रशासन विभाग
2. आस्थापना विभाग
3. अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण नियंत्रण, फेरीवाला धोरण अंमलबजावणी
4. समाजविकास विभाग (NULM सह)
5. संगणक विभाग व नागरी सुविधा केंद्र
6. निवडणुक विभाग
7. परिवहन विभाग
8. परवाना विभाग
9. ई-टेंडरींग व सी.सी.टी.व्ही विभाग
10. सर्व प्रभाग समिती नियंत्रण व समन्वय

**(क) श्री. स.पा. वाघमारे, उपायुक्त**

1. कर विभाग
2. स्थानिक संस्था कर विभाग
3. शिक्षण विभाग

4. ग्रंथालय विभाग
5. जाहिरात विभाग
6. भांडार विभाग
7. अभिलेख विभाग
8. क्रिडा विभाग
9. पशुसंवर्धन विभाग
10. बाजार लिलाव विभाग
11. पे ॲन्ड पार्क, भुईभाडे
12. महिला व बाल कल्याण विभाग
13. वैद्यकीय आरोग्य विभाग

संबंधित उपायुक्तांनी वरील कामकाज, वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मर्यादेत राहुन पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरण मंजुर करण्यापुर्वी मुख्य लेखापरिक्षक यांची सहमती घेण्यात यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पुर्व मान्यतेने व मंजुरीनेच पाठवणे बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पहात असताना महानगरपालिका उपायुक्तांनी आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी, ह्या सर्व प्रयोजनासाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत, असे महाराष्ट्र महानरगपालिका अधिनियमातील कलम 49 नुसार मानले जाईल.

(चंद्रकांत डांगे, भा.प्र.से)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
1. डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त
2. श्री. अजित मुठे, उपायुक्त
3. श्री. स.पा. वाघमारे, उपायुक्त

प्रत माहितीस्तव :-
1) मा.महापौर
2) मा.उपमहापौर
3) मा.सभापती, स्थायी समिती
4) मा.सभागृह नेता
5) मा.विरोधी पक्ष नेता
6) शहर अभियंता
7) मुख्यलेखापरीक्षक
8) मुख्यलेखाधिकारी
9) सर्व संबंधित विभागप्रमुख
10) आस्थापना/निवडनस्ती